आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१६ जून २०२४ - रविवार

सलग तिसऱ्या कार्यकाळासाठी पदाची शपथ घेतल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमाच्या १११व्या भागात येत्या ३० तारखेला देशवासियांशी संवाद साधणार आहेत.

या कार्यक्रमासाठी नागरिकांनी आपले विचार आणि सूचना १८००-११-७८०० या टोल फ्री क्रमांकावर तसंच नरेंद्र मोदी ॲप किंवा मायगव्ह खुल्या मंचावर येत्या २८ जूनपर्यंत कळवाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

राज्यात उद्या बकरी ईदचा सण साजरा होणार असून त्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तयारी केली आहे. कुर्बानीसाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आली असून पशूंच्या तपासणीसाठी पशुसंवर्धन विभागातर्फे विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

राज्यपाल रमेश बैस यांनी ईद अल - अझा म्हणजेच बकरी ईद निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

ईद अल - अझा हा सण त्याग, करुणा आणि परोपकाराचा संदेश देतो. या सणा निमित्त उदात्त मूल्यांच्या जपणुकीसाठी प्रयत्न करण्याचा संकल्प करण्याचं आवाहन राज्यपालांनी संदेशात केलं आहे.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीरमधल्या सुरक्षा स्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक सुरू आहे. जम्मूत अलिकडे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर तिथल्या सुरक्षा स्थितीचा तसंच अमरनाथ यात्रेसंबंधी तयारीचा आढावा या बैठकीत घेण्यात येत आहे.

<><><><><>

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांनी जिल्ह्यात महसूल भवन इथं काल मान्सूनपूर्व आढावा बैठक घेतली.  या महिन्याअखेर ७५ टक्केहून अधिक पीक कर्जाचं वाटप करावं, अशी सूचना त्यांनी यावेळी बँकांना केली. पावसाळ्यात जिल्ह्यात आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास यंत्रणेनं सज्ज राहावं असे निर्देशही पालकमंत्र्यांनी यावेळी दिले.

<><><><><>

शालेय विद्यार्थ्यांना एसटी बसचे पास आता थेट शाळेत वितरित करण्यात येणार आहेत. एसटी महामंडळाकडून ‘एसटी पास थेट तुमच्या शाळेत’ ही मोहीम १८ जूनपासून राबवली जाणार आहे.

<><><><><>

१८ व्या मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा आज दुसरा दिवस आहे. यंदा पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेल्या डॉक फिल्म बझारचं उद्धाटनवेब सीरीज निर्मात्या आणि एमी पुरस्कार विजेत्या अपूर्वा बक्षी यांच्या हस्ते आज  झालं. पत्रसूचना कार्यालयाच्या अतिरिक्त महासंचालक स्मिता वत्स-शर्मा आणि महोत्सवाचे संचालक पृथुल कुमार यावेळी उपस्थित होते. नवोदित माहितीपट निर्मात्यांसाठी एक व्यासपीठ या प्रदर्शनामुळे उपलब्ध झालं आहे.

<><><><><>

राज्यशासन अधिकारी महासंघाच्या मागण्यांबद्दल राज्यशासन सकारात्मक असून त्याबद्दल लवकर निर्णय घेतला जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याची माहिती अधिकारी महासंघाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. सेवानिवृत्तीचं वय साठ वर्षे करावं, केंद्राच्या धर्तीवर महागाई भत्त्यात वाढ, अतिरिक्त

सचिव पदांची निर्मिती तसंच रिक्त पदांची भरती, इत्यादी महासंघाच्या मागण्या आहेत. आचारसंहितेमुळे प्रलंबित राहिलेल्या या मागण्यांवर तातडीनं निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांसोबत शुक्रवारी चर्चा झाल्याची माहिती अधिकारी महासंघाने या पत्रकात दिली आहे.

<><><><><>

भारतीय टेनिसपटू सुमित नागल याने बनार्बे जपाटा मिरालेस या स्पेनच्या टेनिसपटूला हरवून पेरुगिया चॅलेंजर्स स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. दुहेरीच्या अंतिम फेरीत मात्र भारताचा एन श्रीराम बालाजी आणि जर्मनीच्या आंद्रे बेगेमॅन या जोडीला अर्जेंटिना आणि मेक्सिको यांच्या टेनिसपटू जोडीपुढे हार पत्करावी लागली.

<><><><><>

मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात आज पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे. दरम्यान, कोकणात बऱ्याच ठिकाणी वीजांसह पावसाची शक्यता आहे, येत्या तीन ते चार तासांत कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात हलक्या स्वरुपाचा पाऊस कोसळण्याची शक्यता आहे. यादरम्यान, कोल्हापूर जिल्ह्यात ३० ते ४० किलोमीटर वेगानं वादळी वारे वाहण्याचा अंदाजही पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

<><><><><>

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाने स्कॉटलंडवर पाच गडी राखून मात केली आहे. पहिल्यांदा फलंदाजी करताना स्कॉटलंडच्या संघाने वीस षटकात पाच गड्याच्या बदल्यात १८० धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियानं आपले पाच गडी गमावले. मात्र शेवटच्या षटकातले दोन चेंडू

शिल्लक असताना १८६ धावा करत सामना जिंकला. दरम्यान, काल भारत आणि कॅनडा संघादरम्यानचा सामना पावसामुळे रद्द झाला. त्यामुळे दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला. तर दुसऱ्या सामन्यात इंग्लंडने नामिबियाचा डकवर्थ लुईस नियमाच्या आधारे ४१ धावांनी पराभव केला.

<><><><><>

अहमदनगर जिल्ह्यातल्या मेंढवन गावात तीन शाळकरी मुलींचा बुडून मृत्यू झाला. अर्धवट काम सुरू असलेल्या शेततळ्याजवळ काल दुपारी  या मुली खेळत होत्या.  तेव्हा पावसाचं पाणी साठलेल्या खड्ड्यात  बुडून त्यांचा मृत्यू झाला.

//<><><><><>//